**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २७ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **मुंबईमध्ये इंडिया मेरिटाईम वीक परिषदेचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते उद्घाटन.**
2. **भारताची संरक्षण निर्यात २३ हजार ५०० कोटी रुपयांच्या विक्रमी स्तरावर पोहोचल्याची संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांची माहिती.**
3. **छठ पूजा उत्सवासाठी नागपूर महानगरपालिका सज्ज; अंबाझरी, फुटाळा, पोलिस लाईन टाकळी, गोरेवाडा इथं विशेष सोय.**
4. **पुढील २-३ दिवसांमध्ये विदर्भात पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त.**

-----------------------------------------

गृहमंत्री अमित शहा

गेल्या दशकभरात सरकारने मेरिटाईम अर्थव्यवस्थेत केलेल्या धोरणात्मक सुधारणांमुळे आज भारत जगात मेरिटाईम क्षेत्रातला सशक्त देश म्हणून उभा असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. शहा यांच्या हस्ते आज मुंबईत इंडिया मेरिटाईम वीक या परिषदेचं उद्घाटन झालं, तेव्हा ते बोलत होते. गेट वे ऑफ इंडिया सारख्या ऐतिहासिक वास्तू लाभलेल्या ठिकाणी होणाऱ्या मेरिटाईम वीक या परिषदेत गेट वे ऑफ वर्ल्ड दृष्टिकोनाविषयी विचारमंथन होणार असल्याचं ते म्हणाले.

***(होल्ड बाईट - केंद्रीय गृहमंत्री अमित शहा ३४ सेकंद)***

***भारत की मैरीटाइम स्ट्रेंथ और स्ट्रैटेजिक लोकेशन इस बात से पता चलता है कि हमारी कोस्टलाइन ग्यारह हजार किलोमीटर से लंबी है। 13 कोस्टल राज्य और यूटी और जीडीपी में लगभग साठ प्रतिशत योगदान हमारे मेरी टाइम बिज़नेस का है। 23.7 लाख स्क्वेयर किलोमीटर का क्रिस्टल इकोनॉमिक ज़ोन दुनियाभर के इन्वेस्टर और मैन्युफैक्चरर को आकर्षित करता है और 800 मिलियन की आबादी लगभग आधी आबादी ये मेरी टाइम स्टेट में बचती है।***

इंडिया मेरिटाईम वीक हा जगातल्या सर्वात प्रमुख सागरी मेळाव्यापैकी एक झाला असून त्यात ८५ देशांनी सहभाग घेतल्याचं केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी

आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यावळी म्हणाले. महाराष्ट्रातलं वाढवण हे बंदर जगातल्या सर्वोत्तम दहा बंदरांपैकी एक असेल, त्यामुळे भारताची सागरी शक्ती आणखी मजबूत होईल, असं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. या नौकांमुळे मासेमारांना खोल समुद्रात जाऊन टूनासारखे मासे पकडणं शक्य होणार आहे. या सोहळ्याला गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, ओदिशाचे मुख्यमंत्री मोहनचरण मांझी, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आदि उपस्थित होते.

-----------------------------------------

संरक्षण निर्यात

भारताची संरक्षण निर्यात आता २३ हजार ५०० कोटी रुपयांच्या विक्रमी स्तरावर पोहोचल्याची माहिती संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी दिली आहे. नवी दिल्ली इथं झालेल्या एसआयडीएम वार्षिक परिषदेला ते आज संबोधित करत होते. गेल्या दशकात देशांतर्गत संरक्षण उत्पादन १ लाख ५० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त वाढलं आहे. नाविन्य, संरचना आणि उत्पादन अशा तिन्ही बाबींवर भर दिल्यानं ऑपरेशन सिंदूर यशस्वी ठरलं. स्वदेश निर्मित शस्त्रास्त्रांमुळे भारताची प्रतिष्ठा आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढल्याचंही सिंग यावेळी म्हणाले.

-----------------------------------------

जीएसटी बचत महोत्सव

देशभरात सध्या जीएसटी बचत महोत्सव सुरू असून यामुळे नागरिकांमध्ये खूप उत्साह आहे. विशेषकरून महिला वर्गात याबाबत उत्साहाचे वातावरण आहे. ऐकूया एका गृहिणीची प्रतिक्रिया -

***(होल्ड बाईट - गृहिणी)***

***केंद्र सरकारने आता जो जीएसटी कर कमी केला आहे. त्यासाठी केंद्र सरकारचे मी मनापासून आभार मानते कारण आमच्या सारख्या गृहिणींना दैनंदिन वस्तूच्या घरगुती लागतात. त्यावर जीएसटी कमी झाल्यामुळे आमचा जो किराणा आहे भाजीपाला आहे किंवा आम्ही जो ऑनलाइन खरेदी करतो त्यावर टॅक्स कमी पडला. त्यामुळे आमचं बजेट जे आहे ते सणावाराच्या निमित्ताने कोलमडत नाही आहे याचा मला त्याचा आनंद होत आहे.***

-----------------------------------------

दक्षता जागरूकता सप्ताह

सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा वाढविण्यासाठी आणि भ्रष्टाचारमुक्त समाजाचे ध्येय साध्य करण्यासाठी आजपासून देशभरात दक्षता जागरूकता सप्ताह २०२५ साजरा केला जात आहे. 'दक्षता - आपली सामूहिक जबाबदारी' ही यंदाच्या जागरूकता सप्ताहाची संकल्पना आहे. विविध मंत्रालये, विभाग, सार्वजनिक उपक्रम, बँका, सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयात आज प्रतिज्ञा घेऊन सप्ताहाची सुरुवात झाली. केंद्रीय दक्षता आयुक्त प्रवीणकुमार श्रीवास्तव आणि दक्षता आयुक्त ए. एस. राजीव यांनी आज नवी दिल्ली इथं केंद्रीय दक्षता आयोगाच्या अधिकाऱ्यांना शपथ देववली. विविध खाजगी आणि सरकारी आस्थापनांसह नागपूर आकाशवाणी कार्यालय, विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय आणि विभागीय आयुक्त कार्यालयात देखील आज दक्षता जागरूकता सप्ताहानिमित्त शपथ घेण्यात आली.

-----------------------------------------

रन फॉर युनिटी

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त येत्या ३१ तारखेला देशभरात रन फॉर युनिटी या दौडचं आयोजन करण्यात आलं आहे. या दौडमधे सहभागी होऊन वल्लभभाई पटेलांच्या विचारांचा सन्मान करावा, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला केलं आहे.

-----------------------------------------

मनपा छठ

उत्तर भारतीयांचा प्रमुख धार्मिक उत्सव छठ पूजेनिमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे अंबाझरी, फुटाळा, गोरेवाडा तलाव तसेच पोलिस लाईन टाकळी इथं विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मनपाचे उपायुक्त राजेश भगत यांनी आज फुटाळा तलाव परिसरातील सुविधांची पाहणी केली. आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार स्वच्छता, सुरक्षा, विद्युत व्यवस्था, बॅरिकेडिंग, पेयजल आणि कपडे बदलण्यासाठी खोल्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. पर्यावरण संरक्षणासाठी निर्माल्य तलावात न टाकण्याचं आवाहन मनपाद्वारे करण्यात आलं आहे.

-----------------------------------------

छठ पर्व

छठ पर्वाच्या तिसऱ्या दिवशी आज बिहारमध्ये लाखो भाविकांनी सूर्याला अर्घ्य दिलं. छठ पर्वासाठी बिहारमध्ये गंगा, गडग, कोसी, महानंदा, बागमतीसह

राज्यातल्या अनेक नद्यांवर विशेष छठ घाट सजवण्यात आले आहेत. या निमित्तानं गंगेच्या ७६ घाटांवर विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी देशवासीयांना छठ पूजेच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान सूर्य आणि छठी मैया यांच्या पूजनानं निसर्गाच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळत असते, असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. गृहमंत्री अमित शहा यांनीही देशवासीयांना छठ पर्वाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी राज्यात छठपूजेनिमित्त सार्वजनिक सुटी जाहीर केली आहे.

-----------------------------------------

बच्चू कडू

नागपूरमध्ये उद्या राज्यभरातील शेतकरी संघटना महाएल्गार आंदोलन करणार आहेत. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, शेतमालाला हमीभाव, दिव्यांगांना ६ हजार रुपये मानधन, तसंच मेंढपाळ आणि मच्छीमारांच्या हक्कांसाठी हे आंदोलन केलं जाणार असल्याचं प्रहार पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी सांगितलं. ज्येष्ठ शेतकरी नेते विजय जावंधिया, राजू शेट्टी, अजित नवले, राजन क्षीरसागर, महादेव जानकर, वामनराव चटप यांच्यासह अनेक नेते या आंदोलनात सहभागी होणार आहेत.

-----------------------------------------

सरन्यायाधीश भूषण गवई

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी पुढील सरन्यायाधीश पदासाठी न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नावाची शिफारस केली आहे. सरन्यायाधीश गवई येत्या २३ नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त होत असून त्यानंतर न्यायमूर्ती सूर्यकांत हे सरन्यायाधीशपदाची सूत्रं स्वीकारतील. या शिफारशीनंतर केंद्र सरकार त्यांच्या नावाची अधिसूचना जारी करेल. त्यानंतर न्यायमूर्ती सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीशपदाची शपथ घेतील. न्यायमूर्ती सूर्यकांत यांना १४ महिन्यांचा कालावधी मिळणार असून ते ९ फेब्रुवारी २०२७ रोजी सेवानिवृत्त होणार आहेत.

-----------------------------------------

हवामान

भारतीय हवामान खात्याद्वारे प्राप्त माहितीनुसार पूर्व-विदर्भ क्षेत्रात आज पासून ते ३० ऑक्टोबर २०२५ दरम्यान अतिवृष्टीची शक्यता वर्तविण्यात आली

आहे.  या अनुषंगानं शेतकरी बांधवांनी शेतमालाची पुरेशी काळजी घेण्याच्या सूचना भंडारा  जिल्हा प्रशासन, भंडारा यांच्या वतीनं करण्यात येत आहे. या दरम्यान विजांचा कडकडाट, सोसाट्याच्या  वाऱ्यासह  पाऊस पडणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, आज चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ जिल्ह्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पर्जन्यमान राहण्याचा इशारा देण्यात आला असून उद्या देखील याच जिल्ह्यांसह वर्धा आणि वाशिम जिल्ह्यात देखील असंच हवामान राहण्याची शक्यता आहे.  याशिवाय भंडारा, गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी पर्जन्यमान राहू शकतं.  परवा,  29 तारखेला गडचिरोली आणि यवतमाळ जिल्ह्यात मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.  यादरम्यान भंडारा, गोंदिया, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात देखील काही ठिकाणी मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

----------------------------------------

पक्ष प्रवेश

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटाचे ज्येष्ठ नेते माजी नगराध्यक्ष सुरेश पोरेड्डीवार, माजी प्राचार्य कविता पोरेड्डीवार, माजी सभापती विजय गोरडवार, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष हर्षलता येलमुले, माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड. लालसू नोगोटी यांच्यासह माजी नगरसेवक, नगरसेविका आणि शेकडो कार्यकर्त्यांनी आज काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात गडचिरोली येथे आयोजित कार्यक्रमात काँग्रेसमध्ये प्रवेश केला, विधानसभेचे काँग्रेसचे गटनेते आमदार विजय वडेट्टीवार, रामदास मसराम आणि अभिजित वंजारी, काँग्रेसचे निरीक्षक संदेश सिंगलकर, जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे यांच्यासह अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

----------------------------------------

कार्तिकी एकादशी

यंदा श्री क्षेत्र पंढरपूर येथे २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या कार्तिकी एकादशी यात्रेसाठी भाविकांच्या सोयीसाठी एसटी महामंडळातर्फे राज्यभरातून तब्बल ११ शे ५० जादा बसेस सोडण्याची तयारी करण्यात आली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबरदरम्यान ‘चंद्रभागा’ बसस्थानकातून या जादा बससेवा चालविण्यात येतील. यात्रेदरम्यान वाहतूक कोंडी टाळण्यासाठी १२० पेक्षा जास्त कर्मचारी

तैनात राहतील, तर वाहन दुरुस्ती आणि देखभालीसाठी स्वतंत्र पथकेही कार्यरत असतील. ४० पेक्षा जास्त प्रवाशांच्या मागणीवर गावातून थेट पंढरपूरला जाणाऱ्या बसेसची सोय करण्यात आली असून ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी सवलत लागू राहील.

-----------------------------------------